Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# नाशिक जिल्ह्यातील पश्चिम विभागातील आदिवासी लोकसंख्येच्या अवलंबता भाराचे भौगोलिक विश्लेषण

**प्रा.डॉ. घोलप एन. एन.**
**कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.सटाणा**
**ता.बागलाण,जि. नाशिक (महाराष्ट्र)**

**सारांश-** नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातील एक वेगाने विकसित होणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. नाशिक जिल्हा कृषी, धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात नेहमीच अग्रगण्य राहिलेला आहे. परंतु या जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाणही जास्त आहे. २०११ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यात २३.९५% इतकी आदिवासी लोकसंख्या वास्तव्य करत होती. म्हणून आदिवासी लोकांच्या अवलंबताभाराचा अभ्यास करण्यासाठी काही आदिवासी तालुके निवडून त्यातील अवलंबताभार काढलेला आहे. कारण एखाद्या देशाचा किंवा प्रदेशाचा विकास कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्या किती आहे, यावर अवलंबून असतो. जर कार्यरहित लोकांपेक्षा कार्यप्रवण लोकांचे प्रमाण अधिक असेल तर आशा प्रदेशाचा विकास चांगला होतो. म्हणून त्यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न या संशोधन पेपरमध्ये करण्यात आलेला आहे. तसेच लोकांच्या कार्यक्षमतेवर कोणत्या भौगोलिक, सामाजिक,राजकीय घटकांचा परिणाम होतो त्याही घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आदिवासी तालुक्यांमध्ये बागलाण, कळवण, दिंडोरी, पेठ, सुरगाणा, या तालुक्यांचा अभ्यासासाठी विचार करण्यात आलेला आहे. बागलाण तालुक्यात कार्यप्रवण लोकसंख्येचे प्रमाण २४.५८ %, कळवण तालुक्यात १७.२९%, दिंडोरी तालुक्यात २२.५३%, पेठ तालुक्यात १२.७८ % तर सुरगाणा तालुक्यात २३.८३ % इतके प्रमाण क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार मिळालेल्या आकडेवारीवरून दिसते. त्यामध्ये काही विशेष कारणे देखील निदर्शनास येतात. त्यामध्ये उच्च शिक्षणाचा अभाव, सामाजिक घटक, आर्थिक घटकांचा परिणाम तसेच सांस्कृतिक घटक इत्यादींचा परिणाम या लोकांच्या अवलंबताभारावर असलेला दिसून येतो. तसेच भौगोलिक घटकांचा परिणाम विशेष करून या लोकांवर झालेला जाणवतो कारण या ग्रामीण क्षेत्रात आर्थिक विकासाची कमतरता असल्याने त्यांचे राहणीमान त्यांच्या सवयी, त्यांची आवड, जीवनशैलीतील बदल अशा घटकांचा परिणाम होत असल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात क्षेत्रीय अभ्यासावरून मिळविलेल्या आकडेवारीनुसार या अभ्यास क्षेत्रात कार्यप्रवण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. परंतु या क्षेत्राचा विकास मात्र प्रत्यक्षात झालेला दिसत नाही.

बीजसंज्ञा: आदिवासी लोकांचे वयोगट, अवलंबताभार, कारणे व उपाय

**प्रस्तावना-**

आधुनिक यंत्रयुगात आदिवासी बांधव हा आजही मागासलेलाच राहिलेला आहे. त्यांचा उदरनिर्वाह पुरता मर्यादित व्यवसाय, भविष्याविषयी बेफिकिरपणा या तत्त्वावर जीवनशैली अवलंबून असलेली दिसते. त्यामुळे आदिवासी बांधवांची कार्यरहित व कार्यप्रवण लोकसंख्येची प्रत्यक्षात स्थिति कशी आहे, याचे अध्ययन करण्यासाठी अवलंबताभाराचे प्रमाण काढणे आवश्यक आहे. लोकसंख्येच्या अभ्यासात लोकसंख्या वाढीबरोबरच तिच्या रचनेला देखील महत्त्वाचे स्थान असते. कारण लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांमध्ये प्रामुख्याने वय, लिंग, धर्म,जात, भाषा, वंश, साक्षरता, वैवाहिक स्थिती, उत्पन्न व व्यवसाय अशा लोकसंख्याशास्त्रीय आर्थिक, सामाजिक. सांस्कृतिक, घटकांचा समावेश होतो. तसेच कोणत्या वयोगटात कोणती लोकसंख्या किती आहे यावर आर्थिक विकास अवलंबून असतो. **लोकसंख्येच्या वयविभाजनावर आधारलेले अवलंबताभार मोजणारे परिणाम म्हणजे अवलंबताभार होय.**

आदिवासी कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्येच्या प्रमाणावर जन्मदर, मृत्युदर, विवाहवय, वयोरचना आयुर्मान, कुटुंबाचा आकार, किंवा एकत्र कुटुंब पद्धती, ग्रामीण व नागरी भागातील वास्तव्य या घटकांचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्येच्या रचनेत बदल होतो. म्हणून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यातील अवलंबता भाराचे अध्ययन करून कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अवलंबताभाराच्या अभ्यासामुळे आपल्याला त्यांची जीवनशैली, रोजगाराची उपलब्धता, आर्थिक विकास पातळी यांची माहिती मिळते. भविष्यकाळात रोजगाराची उपलब्धता, त्यांच्या गरजा व गरजांवर होणारा खर्च, त्यांना कोणत्या सुविधा पुरवाव्या लागतील यांचे नियोजन करण्यास मदत होते. आर्थिक भार किती पडेल याचा विचार करून भविष्यात नियोजन करता येते. म्हणून हा अभ्यास देशाच्या विकासासाठी महत्त्वाचा ठरतो

**अभ्यासाची उद्दिष्टे -**

१.आदिवासी लोकसंख्येचे अवलंबता गुणोत्तराचे अध्ययन करणे

२.कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्येचे तुलनात्मक अध्ययन करणे

३.अवलंबता भार कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन माहिती स्रोत व अभ्यास पद्धती-**

प्रस्तुत संशोधन निबंधात आदिवासी लोकसंख्येचा अवलंबता भाराचे अध्ययन करण्यासाठी नमुना पद्धतीने आकडेवारी मिळवलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत निबंधातील आकडेवारी ही प्राथमिक उगम स्रोतावरच पूर्णपणे अवलंबून आहे. तसेच अवलंबताभाराची कारणे शोधण्यासाठी काही अनुभवी व्यक्ती तसेच सरपंच, ग्रामसेवक, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून माहिती मिळविलेली आहे. द्वितीय स्रोतामध्ये काही संदर्भ पुस्तके, लेख, बातमीपत्र व इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे. क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार मिळविलेल्या आकडेवारीचे संस्करण करून तिची मांडणी तक्ते व आलेखाच्या स्वरूपात मांडून विश्लेषण केलेले आहे.

आदिवासी लोकसंख्येचे अवलंबताभार काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केलेला आहे.


$$\text{अवलंबता गुणोत्तर} = \frac{d_1}{d_2} \times १००$$

$d_1$= ० ते १४ व ६१ पेक्षा जास्त वयोगटातील एकूण लोकसंख्या

$d_2$ ,= १५ ते ६० वयोगटातील एकूण लोकसंख्या

**अभ्यास क्षेत्र-**

अभ्यासासाठी नाशिक जिल्ह्यातील वायव्येकडील काही तालुक्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये बागलाण,कळवण,दिंडोरी,पेठ,सुरगाणा हे तालुके निवडण्यात आलेले आहेत. या आदिवासी तालुक्यातील वयोरचना विचारात घेतलेली आहे. अभ्यास क्षेत्राच्या पश्चिमेकडील दिशेला गुजरात राज्यातील डांग जिल्ह्याची सीमा लाभलेली आहे. उत्तरेला धुळे या आदिवासी जिल्ह्याची सीमा लाभलेली आहे. तसेच पूर्वेला मालेगाव,चांदवड या नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांची सीमा असून दक्षिणेला त्र्यंबकेश्वर, नाशिक ,चांदवड निफाड या नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांची सीमा लाभलेले आहे. अभ्यास क्षेत्राचा सर्वसाधारण अक्षवृत्तीय विस्तार १९ अंश ५५ मि.उ ते २० अंश ५३ मि. उ. असा असून रेखावृत्तीय विस्तार ७३ अंश ०२ मि. पू.ते ७४ अंश २४ मि.पू असा आहे. या दरम्यान हे अभ्यास क्षेत्र येत असून या अभ्यासक्षेत्रात आदिवासी लोकसंख्या मोठ्या संख्येने वास्तव्य करते.





**विषय विवेचन-**

अभ्यास क्षेत्रातील बागलाण, कळवण, दिंडोरी, पेठ व सुरगाणा या आदिवासी तालुक्यातील प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण करून माहिती मिळवली आहे. मिळवलेल्या महितीवर संस्करण करून तक्तेव आलेखाच्या स्वरूपात मांडून विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र-१ - अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येचे वयोगट स्थिती**

| अ . नं | तालुके | ०-१४ | | १५-६० | | ६१ च्या पुढे | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पु | स्त्री | पु | स्त्री | पु | स्त्री | पु | स्त्री | एकूण |
| १ | बागलाण | ५४ | ३५ | १६७ | १४९ | ०८ | ०६ | २२९ | १९० | ४१९ |
| २ | कळवण | ३९ | २० | १८२ | १४८ | ०६ | ०४ | २२७ | १७२ | ३९९ |
| ३ | दिंडोरी | ५४ | ३५ | १९६ | १५७ | ०५ | ०७ | २५५ | १९९ | ४५४ |
| ४ | पेठ | २४ | १० | १४१ | १२५ | ०३ | ०२ | १६८ | १३७ | ३०५ |
| ५ | सुरगाणा | ५८ | २८ | १८८ | १७० | १६ | १० | २६२ | २०८ | ४७० |
| | एकूण | २२९ | १२८ | ८७४ | ७४९ | ३८ | २९ | ११४१ | ९०६ | २०४७ |

**संदर्भ-क्षेत्रीय सर्वेक्षण**



**(तक्ता क्रमांक -२) - आदिवासी लोकसंख्येची वयोगटनिहाय एकूण लोकसंख्या**

| अ. नं | वयोगट | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तालुके | ०-१४ | | | १५-६० | | | ६१ च्या पुढे | | | एकूण | | |
| | | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| १ | बागलाण | १२.१८ | ८.३६ | २१.२४ | ३९.८६ | ३५.५६ | ७५.४२ | १.९० | १.४४ | ३.३४ | ५४.६५ | ४५.३५ | १०० |
| २ | कळवण | ९.७८ | ५.०१ | १४.७९ | ४५.६१ | ३७.१० | ८२.७१ | १.५० | १.०० | २.५० | ५६.९० | ४३.१० | १०० |
| ३ | दिडोरी | ११.८९ | ७.७० | १९.८९ | ४३.१७ | ३४.५८ | ७७.७५ | १.१० | १.५४ | २.६४ | ५६.१६ | ४३.८४ | १०० |
| ४ | पेठ | ७.८७ | ३.२८ | ११.१५ | ४६.१७ | ४०.९९ | ८७.४२ | ०.९८ | ०.६५ | १.६३ | ५५.०८ | ४४.९२ | १०० |
| ५ | सुरगाणा | १२.३५ | ५.१५ | १८.३० | ४०.०० | ३६.१७ | ७६.१७ | ३.४१ | २.१२ | ५.५३ | ५५.७५ | ४४.२५ | १०० |

**संदर्भ-क्षेत्रीय सर्वेक्षण**


**तक्ता क्र-**२ नुसार अभ्यास क्षेत्रातील वयोगटाचे शेकडा प्रमाण दर्शविलेले आहे. यामध्ये बागलाण तालुक्यातील ० ते १४ या वयोगटातील पुरुष व स्त्रिया यांचे एकूण शेकडा प्रमाण २१.२४ टक्के इतके आहे. कळवण तालुक्यात ९.७८ टक्के पुरुषांचे प्रमाण व स्त्रियांचे ५.०१ टक्के इतके आहे. यांचे एकूण शे. प्रमाण १४.७९ इतके आहे. या अभ्यास क्षेत्रातील तालुक्यांमध्ये ० ते १४ या वयोगटामध्ये असे दिसते की, सर्वात जास्त पुरुषांचे प्रमाण १२.३५ % सुरगाणा तालुक्यात असून सर्वात कमी पुरुषांचे प्रमाण पेठ तालुक्यात ७.८७ % इतके आहे. तसेच स्त्रियांच्या वयोगटाचा विचार करता सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण बागलाण तालुक्यात असून सर्वात कमी स्त्रियांचे प्रमाण पेठ तालुक्यामध्ये 3.28% इतके आहे.

तसेच १५ ते ६० या वयोगटातील प्रौढांचा विचार करता असे दिसते की, सर्वात जास्त पुरुषांचे प्रमाण पेठ तालुक्यात असून ते प्रमाण शेकडा ४६.१७ % इतके आहे. सर्वात कमी बागलाण तालुक्यात पुरुषांचे शेकडा प्रमाण ३९.८० % इतके आहे तर स्त्रियांमध्ये,सर्वात जास्त प्रमाण पेठ तालुक्यात असून हे शेकडा प्रमाण ४०.९९ % इतके आहे. सर्वात कमी स्त्रियांचे प्रमाण दिंडोरी तालुक्यात असून शेकडा प्रमाण ३४.२८% इतके आहे. ६१ या वृद्ध वयोगटामध्ये एकूणच पुरुष व स्त्रिया हे लिंग गुणोत्तर अतिशय कमी असून पुरुषांची संख्या या वयोगटात सर्वात कमी पेठ तालुक्यात असून हे प्रमाण ०.९८ टक्के इतके आहे. तर सर्वात जास्त पुरुषांची संख्या सुरगाणा तालुक्यात असल्याचे दिसून येत. स्त्रियांच्या वयोगटाचा विचार करता सर्वात कमी शे .प्रमाण ०.६५ टक्के पेठ तालुक्यात आहे. सर्वात जास्त स्त्रियांची संख्या या वयोगटामध्ये सुरगाणा तालुक्यात असल्याचे दिसून येते.

अभ्यास क्षेत्रामध्ये पुरुष व स्त्रियांचा तुलनात्मक अभ्यास करतात असे दिसते की,या अभ्यास क्षेत्रामध्ये सर्वात जास्त पुरुषांची संख्या ही कळवण तालुक्यात असून हे शेकडा प्रमाण ५६.९० टक्के इतके आहे. सर्वात कमी पुरुषांचे प्रमाण बागलाण तालुक्यात असल्याचे दिसून येते हे शेकडा प्रमाण ५४.६५ % इतके आहे. स्त्रियांमध्ये सर्वात कमी प्रमाण कळवण तालुक्यात असून शेकडा प्रमाण ४३.१० % इतके आहे, तर सर्वात जास्त स्त्रियांची संख्या पेठ तालुक्यात असल्याचे दिसते.

**(तक्ता. क्र.-3) - अभ्यास क्षेत्रातील अवलंबता भाराचे शे. प्रमाण**

| अ. नं | तालुके | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ०-१४ | ६१ च्या पुढे | एकूण | १५-६०कार्यप्रवण लोकसंख्या |
| १ | बागलाण | २१.२४ | ३.३४ | २४.५८ | ७५.४२ |
| २ | कळवण | १४.७९ | २.५० | १७.२९ | ८२.७१ |
| ३ | दिडोरी | १९.८९ | २.६४ | २२.५३ | ७७.७५ |
| ४ | पेठ | ११.१५ | १.६३ | १२.७८ | ८७.४२ |
| ५ | सुरगाणा | १८.३० | ५.५३ | २३.८३ | ७६.१७ |




**तक्ता क्रमांक-३** नुसार प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार मिळवलेली आकडेवारी दिलेली असून या आकडेवारीचे संस्करण करून तालुक्यातील लोकसंख्येचे शेकडा प्रमाण दिलेले आहे. या तक्त्यानुसार वयोगट विचारात घेऊन अवलंबता गुणोत्तर काढलेले आहे. या तक्त्यामध्ये बागलाण तालुक्याचे एकूण अवलंबताभार २४.५८ % इतके असून त्यातील ० ते १४ या वयोगटातील २१.८४ % लोकसंख्या व ६१ च्या पुढे म्हणजेच वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण ३.३४ % इतके असूनही कार्यरत लोकसंख्या असल्याचे दिसते. तसेच कळवण या आदिवासी तालुक्यात एकूण अवलंबता गुणोत्तर १७.२९ टक्के इतके असून यामध्ये ०-१४ वयोगटात १४.७९ % व २.५० % इतकी लोकसंख्या होते. दिंडोरी तालुक्यातील एकूण अवलंबताभार २२.५३ % इतके असून त्यामध्ये ०.१४ या वयोगटात १९.८९ % व एका ६१ च्या पुढील वयोगटात २.६४ % इतकी लोकसंख्या कार्यरत असल्याचे दिसते. पेठ तालुक्यात एकूण १२.७८ टक्के लोकसंख्या कार्यरत असून त्यामध्ये ०-१४ या वयोगटातील लोकसंख्या ११.१५ % व ६१ च्या पुढील वयोगटात १.६३ टक्के लोकसंख्या समाविष्ट असल्याचे दिसते. सुरगाणा या आदिवासी तालुक्यात एकूण २३.८३ % लोकसंख्या ही कार्यरत असून त्यामध्ये १८.३० टक्के लोकसंख्या ० ते १४ वयोगटातील आहे. तसेच ५.५३ % लोकसंख्या ६१ वयोगटाच्या पुढील वयोगटात समाविष्ट होते. एकंदरीत क्षेत्रीय अभ्यासक्षेत्रात कार्यप्रवण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. तसेच असेही लक्षात येते की, पुरुषांचे प्रमाण हे जास्त आहे. तसेच या अभ्यास क्षेत्रातील कार्यप्रवण लोकसंख्या जास्त असलीतरी विकास झालेला दिसत नाही. कारण १५ ते ६० या लोकसंख्या जास्त असली तरी सर्वच लोकसंख्या उत्पादन करत नाही. तसेच मिळणारे उत्पादनही कमी असते. त्यातील अनेक तरुण वर्गाच्या हाताला काम नाही. मिळणारे उत्पादन केवळ उदारनिर्वाहाची गरज पूर्ण करते त्यातील बरीच लोकसंख्या बेकारिने ग्रासलेली आहे. आदिवासी बाधवांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, आशा अनेक कारणांमुळे विकास झालेला दिसत नाही. आदिवासी लोकांच्या विकासासाठी जनजागृती करणे, कायम स्वरूपी रोजगार संधी निर्माण करणे. यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे, शेतीविकासाठी सुलभ व त्वरित कर्ज उपलब्ध करून देणे. आदिवासी उद्योग कर्ज योजना सर्वसामान्य लोकांच्या घरापर्यंत कशी पोहचेल यासाठी विशेष प्रयत्न करणे अवश्यक आहे.

**निष्कर्ष-**

क्षेत्रातील तालुक्यातील काही निष्कर्ष मिळतात त्यामध्ये प्रथम बागलाण तालुक्यात कार्यप्रवण प्रमाण लोकसंख्या सर्वात कमी असून तेथे सर्वात जास्त कार्यरत लोकसंख्येचे प्रमाण या तालुक्यात असल्याच दिसते.सर्वात जास्त कार्यप्रवण लोकसंख्या पेठ या आदिवासी तालुक्याची असून या तालुक्यात सर्वात कमी कार्यरत लोकसंख्या असल्याचे आढळून येते. सर्वात जास्त ६१ पुढील वयोगटात असणारे लोकसंख्या ही सुरगाणा तालुक्याची असून सर्वात कमी पेठ या तालुक्यात लोकसंख्या असल्याचे दिसते. तर ० ते १४ या वयोगटातील सर्वात जास्त लोकसंख्या बागलाण तालुक्यात असून सर्वात कमी या वयोगटातील संख्या पेठ तालुक्यात आहे. परंतु असे असले तरी या आदिवासी तालुक्यांची कार्यप्रवण लोकसंख्या जास्त असली तरी विकास झालेला दिसत नाही. कारण १५ ते ६० या वयोगटातील बरीच लोकसंख्या कोणत्याही प्रत्यक्ष उत्पादनात सहभागी झालेली दिसत नाही. कारण या

वयोगटातील बऱ्याच तरुणांना रोजगाराच्या वर्षभर संधी उपलब्ध होत नाहीत. काही तरुण शिक्षणात गुंतलेले असतात, केवळ आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे याकडेच या लोकांचा कल असल्याने त्यांचा सर्वांगीण कौटुंबिक विकास झालेला दिसत नाही. यासाठी या भागात खूप मोठी शैक्षणिक चळवळ उभी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

1.Geography of Population,(Hindi) (2021) R.C. Chandna, Publisher: Kalyani Publisher
**2**. लोकसंख्या भूगोल (१९९७) डॉ . टी . एन. घोलप,निशिकांत प्रकाशन,पुणे पा.१५७ ,१५८
3. भारताचा भूगोल ,(२००७) डॉ . डी . वा य . अहिरराव ,इनसाईट पब्लिकेशन ,नाशिक पा .२४०,२४१
4. आदिवासीचे शिक्षण, डॉ . नलिनी पिचड, पा .१४२,१४३ १५३
5. आदिवासीनचे प्रश्न,डॉ ,गोविंद घारे ,आदिम प्रकाशन,पुणे . पा .३१,३२,३३,३४,
6. Nashik District census-2011
7. Social Contextsof Trible Education ,Vimal .P .Shaha(1985)
8. Situation Of Tribal Population In India, ( 2006 ), Mehar S. Gill , Demography vol. III Review article
9. नाशिक जिल्हा विशेषांक, रमेश बालवाड,विदयाभारती प्रकाशन,पा.२० ते २५
10. Status Of Scheduled Tribe In India,(2020) Prof. Anil Kothari & Taranjeet Kaur Matharu, Volume 5, Issue 12
11. “Approaches to Tribal Welfare” in Tribal Development in India: Problems and Prospects, (1982),Bhowmick, Edited . By B. Chaudhuri, Inter-India Publications, New Delhi.